जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७५४ दिनांक - २१/१०/२०२३**

पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर

## "एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबध्द कारवाईचे पुणे पोलीस आयुक्तांचे अर्ध शतक, केवळ १० महिन्याचे कालावधीतील कामगिरी"

### हडपसर पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगार अजय साळुंखे,यांच्यावर एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई

पुणे पोलीस आयुक्तालयातील हडपसर पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **अजय विजय साळुंखे, वय २१ वर्षे, राहणार औदुंबर पार्क, गोपाळपट्टी मांजरी, पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने साथीदारांसह हडपसर पोलीस स्टेशनच्या हद्दीत चाकु, कोयता या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह जबरी चोरी, खंडणी, गंभीर दुखापत, दुखापत, बेकायदेशीर हत्यार बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. मागील ०५ वर्षामध्ये त्याचे विरूध्द ०६ गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते. प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन श्री. रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी नमूद इसमाचे विरुध्द **एम.पी.डी.ए. कायद्यान्वये अमरावती मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.**

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.रितेश कुमार, यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचा पदभार स्विकारल्यानंतर सराईतपणे गुन्हे करून लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे, अवैध धंदे करणारे,सराईत गुन्हेगार यांचेवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे.पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यापासून १० महिन्याचे कालावधीमध्ये सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण करणा-या, दहशत निर्माण करणाया ५० अट्टल गुन्हेगारांना एम.पी.डी.ए. कायद्यांतर्गत राज्यातील विविध कारागृहामध्ये स्थानबध्द केले आहे."पुणे पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत प्रथमच इतक्या कमी कालावधीमध्ये अशा स्वरुपाची प्रभावी कारवाई करण्यात आली आहे."यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी अधिकाधिक प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.

सदर कारवाईसाठी गुन्हे शाखेचे मोका व एमपीडीए सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. आनंदराव खोबरे,पोलीस उप निरीक्षक राजू बहिरट, सहायक पोलीस उप निरीक्षक शेखर कोळी व दिलीप झानपुरे,

पोलीस अंमलदार योगेश घाटगे,संतोष कुचेकर, अविनाश सावंत, सागर बाबरे, अनिल भोंग, तसेच वेगवेगळ्या पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक व त्याचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी अहोरात्र विशेष मेहनत घेऊन कर्तव्य पार पाडले आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे.**मा.पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही ५० वी कारवाई असुन,**यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.